# लिलावाची नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत मलकापूर व मिशन शाळा विभागाच्या प्रक्षेत्रावरील चिकू फळबहाराच्या लिलावाची जाहीर लिलाव ठरविण्यात आला आहे. सदरचे विविरण खालील प्रमाणे आहे.

| अ क्र. | विभागाचे नाव | एकूण झाडे | फळ धारणा झालेली झाडे |
|---|---|---|---|
| १ | मलकापूर विभाग | १६० | १३० |
| २ | मिशन शाळा विभाग | ३३ | ३३ |
| | एकूण | १९३ | १३३ |

वरील प्रमाणे चिकू फळ बहाराचा जाहीर लिलाव दि. १५.१२.२०२३ रोजी मलकापूर विभागावर सकाळी १०.३० वा. व मिशन शाळा विभागावर दुपारी ३.३० वा विभागाच्या कार्यालयामध्ये करण्यात येणार आहे.

तरी इच्छुक व्यापाऱ्यांनी लिलावात भाग घेण्याकरिता विभागावर हजर रहावे. लिलावाच्या अटी व शर्ती सोबत जोडलेले आहेत.

संचालक<br>
मध्यवर्ती संशोधन केंद्र<br>
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला

## मध्यवर्ती संशोधन केंद्र, मलकापूर व मिशन शाळा विभाग डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील चिकु फळबहाराचा जाहीर लिलाव

<u>अटी व शर्ती</u>

१. चिकु फळबहाराचा जाहीर लिलाव ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर करण्यात येईल.
२. कमीत कमी तीन किंवा त्यापेक्षा जास्त बोली बोलणारे हजर असतील तेव्हाच लिलाव पुकारण्यात येईल.
३. बोली मध्ये भाग घेण्या पुर्वी खरेदीदारांना बोलीत भाग घेण्या करीता रू १०००/-अनामत रक्कम जमा करावी लागेल. लिलाव घेतला असेल त्याचे व्यतिरिक्त सर्वांची अनामत रक्कम लिलाव संपताच परत करण्यात येईल.
४. लिलाव घेणाऱ्यास अंतिम बोलीच्या १०० टक्के रक्कम लिलावाच्या दिवशी त्याच ठिकाणी भरावी लागेल अन्यथा लिलाव समितीस एकतर्फी निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार राहतील.
५. जेवढया रकमेचा लिलाव झाला असेल त्या रकमेच्या१० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) लिलावाच्या दिवशीच भरणा करावी लागेल (लिलाव रकमेच्या व्यतीरिक्त).
६. खते, ओलीत, पिक संरक्षण किंवा अन्य कोणतीही मशागत विद्यापीठाच वेळापत्रका नुसार/ उपलब्धते नुसारच केल्या जाईल.
७. झाडांना पाणी देण्यासाठी पाण्याच्या उपलब्धते नुसार पाणी पुरवठा केला जाईल.
८. नैसर्गिक आपत्तीमुळे काही नुकसान झाल्यास त्याकरिता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
९. संपूर्ण फळे तोडणी झाल्यानंतर लिलाव घेणाऱ्यास सुरक्षा ठेव (Security Deposit) परत मिळण्या करिता प्रभारी अधिकारी, मलकापूर व मिशन शाळा विभाग, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला या नावाने अर्ज करावा लागेल त्या नंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.
१०. सुरक्षा ठेव रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.
११. लिलावात भाग घेणा-याची संख्या कमी असल्यास लिलाव प्रक्रीया रद्द करण्यात येईल व पुढच्या तारखेला लिलाव ठेवण्यात येईल.
१२. लिलावाची अपेक्षीत रक्कम न आल्यास लिलाव ना मंजुर करण्याचे अधिकार लिलाव समितीकडे राहतील.
१३. लिलावास अंतिम मान्यता मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, यांची राहील. अंतिम मान्यता मिळाल्या शिवाय लिलाव प्रक्रिया पुर्ण होणार नाही.
१४. झाडांची फळे तोडतांना झाडाची फांदी तुटणार नाही याची काळजी व्यापा-यास घ्यावी लागेल.
१५. रखवालदार ठेवल्यास त्याची माहीती प्रभारी अधिकारी यांना दयावी लागेल.
१६. चिकु फळांच्या व्यतीरिक्त बाहेरील इतर दुसरी फळे विभागाच्या परीसरात विक्री करिता आणता येणार नाही.तसेच प्रक्षेत्रावर दुकान लावता येणार नाही.
१७. लिलावाची अंतिम बोली ग्राहय झाल्यावर संबधीत खरेदी दारास स्वखर्चाने रू १००/-चे जनरल स्टॅम्प पेपर वर करारनामा करून द्यावा लागेल.
१८. कोणत्याही कारणावरून खरेदीदार व लिलाव समिती यांच्या मध्ये वादनिर्माण झाल्यास मा. संचालक मसंके, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.
१९. फळे तोडण्याची अंतिम तारीख १५/०३/२०२३ ही असेल.

प्रभारी अधिकारी
विकास विभाग
म.सं.कें., डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला